# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ३०.०८.२०२६ रविवार**

**पोलीस ठाणे लकडगंज व शिव अमृत फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर संपन्न :**

दिनांक ३०.०८.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. पोलीस ठाणे लकडगंज व सामाजिक संस्था शिव अंमृत फाऊंडेशन व मित्र परिवार यांचे सहकार्याने महादेव संस्थान, मंगळवारी घास बजार, रामपेठ, लकडगंज येथे समाजोपयोगी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरामध्ये आवश्यक नोंदणी, रक्तदात्यांची तपासणी व सुरक्षितता प्रक्रियेचे पालन करुन लकडगंज पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी स्वत: रक्तदान करुन सामाजिक बांधिलकी पार पाडली. नागरिकांचे संयुक्त सहभागातुन राबविलेल्या उपक्रमामुळे सामाजिक सलोखा, जनसहभाग वृध्दींगत होऊन आपत्कालीन परिस्थितीत रक्ताची उपलब्धता वाढविण्यात हातभार लागलेला आहे. गरजु रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध करुन देण्याचे उद्येशाने उपक्रम राबविण्यात आला.

शिबिरामध्ये एकूण १०० रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या व त्या रक्तपिशव्या डागा शासकीय रुग्णालय येथील रुग्णांकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. शिबिराकरीता पोलीस ठाणे लकडगंजचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद कवाडे, पोउपनि सागर भंडारी, पोहवा नरेंद्र गिरडे, प्रविण डाबरे, संघदीप लांजेवार, गजानन गिरी, सुरज देशमुख, निखिलेश शेंडे, हेमंत उईके, पवन पित्तलवार तसेच सामाजिक कार्यकर्ते मनोज चापले, जीवन पराते, कृष्णाजी कांबळी, निलेश रामभुनीवार, राहुल महादुले, रोशन दामले, पवन सोनेकर व अक्षय कोंदलीकर यांचा सक्रिय सहभाग लाभला.





**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे १२.५५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कळमणा मार्केट, खल्ला क्र. ०५, सब्जी मार्केट येथे पांढरा शर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहील स्वप्निल मानवटकर वय १९ वर्षे रा. क्वॉर्टर क्र. ३१३, चिखली

वस्ती, पांगडु वस्ती, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी किरण नारायण देवगडे वय ३२ वर्षे रा. प्लॉट क्र. ६९, ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा, अजनी, नागपूर यांची ओळख त्यांचे मित्राचे माध्यमातुन नारी रोड, कपीलनगर येथे राहणारा इसम नामे गुरुप्रितसिंग मनजीतसिंग वाडे याचेसोबत झाली. त्याने तो भिसी चालविण्याचे काम करतो असे सांगितले. दिनांक १३.०७.२०२४ ते १६.१२.२०२५ दरम्यान, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत मोगा मोटर्स, लाल जिमचे बाजुला, नारी रोड येथील कार्यालयात फिर्यादीकडून ऑनलाईन एकूण ५,५६,०००/— रु. घेतले. तसेच फिर्यादी यांचे मित्र १) निरज यांचेकडून ८,४९,८००/— रु. २) प्रशांत गावंडे यांचेकडून २,५०,०००/— रु. असे तिघांकडून एकूण १६,५५,८००/— रु. घेऊन आरोपीने त्यांना कोणतीही भिसीची रक्कम न देता व फिर्यादी व मित्रांची दिलेली रक्कम परत न करता, त्यांचा अन्यायाने विश्वासघात करुन फिर्यादी व मित्रांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे मपोउपनि. शिवाली उलमुले ९२२६००३४४१ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सिताबर्डी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २९.०८.२०२६ चे १७.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे रितेश त्रिभुवनदास अग्रवाल वय ४६ वर्षे रा. प्लॉट क्र. २१९९, विवेक नगर, सुलतानपुर, उत्तरप्रदेश हे नागपुरात शिक्षण घेणाऱ्या मुलीला भेटण्याकरीता आले होते व धरमपेठ हाऊस हॉटेल येथे मुक्कामी होते. ते पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, बटुकभाई ज्वेलर्स जवळ, धरमपेठ येथील राजभंडार मिष्ठान भंडार येथून मिठाई खरेदी करुन पायदळ जात असता, टिव्हीएस ज्युपिटर गाडी क्र. एम.एच. ४९ सीवाय १९८२ चे चालकाने त्याचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांना धडक मारून, गंभीर दुखापत करून पळुन गेला. फिर्यादीचे जखमी वडीलांना उपचाराकरीता सेव्हन स्टार हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी कु. उन्नती रितेश अग्रवाल वय १६ वर्षे रा. प्लॉट क्र. २१९९, विवेक नगर, सुलतानपुर, उत्तरप्रदेश यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. मनोहर दंदाले ७२४९७२५८७४ यांनी आरोपी दुचाकी चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४,१८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**